# बेरार फायनान्स लिमिटेड

**कॉर्पोरेट आयडेंटिटी क्रमांक : U65929MH1990PLC057829**
नोंदणीकृत कार्यालय : अविनिशा टॉवर, मेहडिया चौक, धन्तोली,
नागपूर -४४००१२. दूर. क्र. ०७१२-६६६३९९९,
वेबसाईट : www.berarfinance.com, ई-मेल : info@berarfinance.com

## २५व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, बेरार फायनान्स लिमिटेडच्या भागधारकांची पंचविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २६ सप्टेंबर २०१५ रोजी नैवेद्यम, दि सेलेब्रेशन सेंटर, एनआयटी जलतरण तलावासमोर, उत्तर अंबाझरी रोड, नागपूर-४४००१० येथे दु. ३.३० वाजता होणार असून बैठकीत, ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वर्षासाठीच्या 'वार्षिक अहवाल २०१४-२०१५' सह भागधारकांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यांवर वैयक्तिकरित्या पाठवलेल्या सूचनेत दिलेल्याप्रमाणे कामकाज होईल. कंपनीकडे ज्या सभसदांचे ईमेल पत्ते नोंदविलेले आहेत अशांना त्यांच्या ई-मेल पत्त्यांवर सदर सूचना व वार्षिक अहवाल (भौतिक प्रतीसाठी विनंती केलेले वगळून) पाठवण्यात आली आहेत. ज्यांचे ई-मेल आयडीज् नोंदणीकृत नाहीत अशा सभासदांना भौतिक प्रती पाठवण्यात आल्या आहेत, त्याचबरोबर कंपनीच्या www.berarfinance.com वरही उपलब्ध आहेत.

सोबतच्या सुचनेत संदर्भित केलेली संबंधित कागदपत्रे, कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेला व तारखेपर्यंत, शनिवार वगळता सर्व कामकाजाच्या दिवशी सर्वसाधारण कामकाजाच्या वेळेत पाहणीसाठी खुली राहतील.

सूचना पाठवून, झाल्यानंतर एखादी व्यक्ती सभासद झालेली असल्यास, त्यांना रिमोट ई-मतदानासाठी लॉगईन आयडी व पासवर्ड एजीएमच्या सूचनेत दिलेल्याप्रमाणे प्रक्रिया करुन घेता येईल किंवा helpdesk.evoting@cdslindia.com किंवा berarfinance@yahoo.com येथे विनंती पाठवल्यास मिळू शकतील.

कंपनी कायदा, २०१३च्या कलम १०८ सह कायद्याच्या संबंधित नियमांनुसार, कंपनी सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) मार्फत रिमोट ई-मतदानाची सुविधा पुरवित आहे. ई-मतदानासाठी सूचनांविषयी कृपया एजीएमची सूचना वाचावी. सदर बैठकीत संमत करावयाच्या प्रस्तावांवर ई-मतदान बुधवार दि. २३ सप्टेंबर २०१५ रोजी स. ९.०० वाजता सुरु होईल आणि शुक्रवार २५ सप्टेंबर २०१५ रोजी सायं. ५.०० वाजता समाप्त होईल. या कालावधीदरम्यान २१ ऑगस्ट २०१५ या निर्धारीत अर्थात कट-ऑफ तारखेला जे कंपनीचे भागधारक असतील अशांनाच केवळ रिमोट ई-मतदान सुविधेचा लाभ घेता येईल. सदर तारीख व वेळेनंतर ई-मतदान करण्याची परवानगी राहणार नाही. मतपत्रिकेद्वारा मतदान करण्याची सुविधा एजीएमच्या ठिकाणी उपलब्ध राहील. एजीएमला उपस्थित राहणाऱ्या ज्या सभासदांनी आधी रिमोट ई-मतदान केलेले नसेल अशांना एजीएमच्या ठिकाणी मतपत्रिकेद्वारा मतदान करण्याचा त्यांचा हक्क बजावता येईल. रिमोट ई-मतदानाद्वारे मतदानाचा हक्क न बजावलेल्या सभासदांनाच फक्त एजीएमच्या ठिकाणी मतपत्रिकेद्वारे मतदान करता येईल. रिमोट ई-मतदानद्वारे मतदान केल्यानंतर एखाद्या सभासदाला एजीएमला उपस्थित राहून सहभाग घेता येईल मात्र त्यांस पुन्हा मतदान करता येणार नाही. सभासदास मतदानाचा अधिकार प्राप्त होण्यासाठी तो सभासद असण्याची निर्धारित अर्थात कट- ऑफ तारीख २१ ऑगस्ट २०१५ राहील.

कंपनीच्या संचालक मंडळाने मतदान प्रक्रिया सुरळीतपणे व पारदर्शक पद्धतीने पार पडावी यासाठी स्क्रूटिनायझर म्हणजेच छाननीकार म्हणून श्री. अमित के. राजकोटिया, प्रॅक्टिसिंग कंपनी सचिव (सी.पी.नं. ५१६२), फ्लॅट नं. १०२, श्रीलक्ष्मी अपार्टमेंट, श्रीधर आर्टसच्यावर, झेंडा स्क्वेअर, धरमपेठ, नागपूर-४४००१० यांची नियुक्त केली आहे.

कुणाही सभासदास ई-मतदानविषयक कसलीही शंका असल्यास त्यांनी www.evotingindia.co.in वरील हेल्प सेक्शन अंतर्गत उपलब्ध ई-मतदान माहिती पहावी वा फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स ('एफएक्यू'ज) पहावेत अथवा helpdesk.evoting@cdslindia.com येथे ईमेल पाठवावा आणि श्री. वेन्सेलस फुर्टाडो, उप व्यवस्थापक, सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस, (इंडिया) लिमिटेड, १७ वा मजला, पी जे टॉवर्स, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४००००१ (दूरध्वनी : १८०० २०० ५५३३) यांच्याशी संपर्क साधू शकतात. एजीएम विषयी अन्य कोणत्याही चौकशीसाठी सभासद, श्रीमती दिपाली बालपांडे, कंपनीच्या कंपनी सचिव यांच्याशी नोंदणीकृत कार्यालय : अविनिशा टॉवर, मेहडिया चौक, धन्तोली, नागपूर - ४४००१२ (दूरध्वनी- ०७१२-६६६३९९९) यांच्याशी संपर्क साधू शकतात.

**संचालक मंडळाच्या आदेशाद्वारे**
**बेरार फायनान्स लिमिटेड करिता**
**स्वाक्षरी/-**
**दीपाली बलपांडे, कंपनी सचिव**

**ठिकाण - नागपूर**
**दिनांक : २६/०८/२०१५**

**(इंग्रजीतील मुळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.)**

8 x16
20677857_2
mtnag
27.8.2015